महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक : पोप्रमा-०४१८/प्र.क्र.१६१/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक : १६ मे २०१८.

विषय :- पोलीस अधीक्षक, धुळे, यांच्या अधिपत्याखालील (१) देवपूर (पूर्व) पोलीस ठाणे व (२) देवपूर (पश्चिम) पोलीस ठाणे यांच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करणे आणि (३) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता सेवा निवासस्थानांचे बांधकाम करणे, या प्रकल्पाच्या नियोजित भूखंडाच्या (भूमापन क्र.११३) सभोवती एकूण १,५३० मी. लांब कुंपण भिंत *(compound wall) (प्रवेश व्दारासह)* बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) शासन पत्र, गृह विभाग, क्र. पोप्रमा-१०१७/ प्र.क्र.५३०/ पोल-७, दिनांक ०१.०२.२०१८.
४) श्री. अनिल गोटे, विधानसभा सदस्य, यांचे दिनांक २६.०३.२०१८ रोजीचे पत्र.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे, यांचे पत्र क्र. प्रशा-१/ १९२९/ २०१८, दिनांक २३.०३.२०१८.

ज्ञापन.-

पोलीस अधीक्षक, धुळे, यांच्या अधिपत्याखालील (१) देवपूर (पूर्व) पोलीस ठाणे व (२) देवपूर (पश्चिम) पोलीस ठाणे यांच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करणे आणि (३) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता सेवा निवासस्थानांचे बांधकाम करणे, याबाबत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई, यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या नियोजित भूखंडाच्या (भूमापन क्र.११३) सभोवती एकूण १,५३० मी. लांब कुंपण भिंत *(compound wall) (प्रवेश व्दारासह)* बांधणे आवश्यक आहे.

२. उक्त कामासाठी उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धुळे, यांनी सन २०१७-१८ च्या दरसूचीनुसार तयार केलेले **रु.२३९.०५ लक्ष** *(रु.१२, ९१३/- प्रति मीटर या दराने)* इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहेत. हे खर्चाचे अंदाज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व **रु.२३९.०५ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजासह, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, धुळे, यांच्या अधिपत्याखालील (१) देवपूर (पूर्व) पोलीस ठाणे व (२) देवपूर (पश्चिम) पोलीस ठाणे यांच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करणे आणि (३) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता सेवा निवासस्थानांचे बांधकाम करणे, या प्रकल्पाच्या नियोजित भूखंडाच्या (भूमापन क्र.११३) सभोवती एकूण १,५३० मी. लांब कुंपण भिंत *(compound wall)* *(प्रवेश व्दारासह)* बांधण्यासाठी **रु.२३९.०५ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, धुळे, आणि पोलीस अधीक्षक, धुळे, यांनी उक्त खर्चाचे अंदाज साक्षांकित करणे आवश्यक आहे;

२) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकाम सुरु करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५३/इमा-२, दिनांक ०७.०५.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०५१६१५०००२६७२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.16 14:58:00 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

३) पोलीस अधीक्षक, धुळे.

प्रत :-

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.

२) अपर मुख्य महासंचालक-*नि*-महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) उप सचिव (तुरुंग), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, धुळे.

५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, धुळे.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
८) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड फाईल (पोल-७).